ISSN: 2348-1390
Impact Factor: 4.321 (IIJIF)

**38.**

# महिला सबलीकरणातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान

**- सौ.सीमा शशिकांत कदम**
वाणिज्य विभाग
सहयोगी प्राध्यापक, गोगटे जोगळेकर महाविद्यालय, रत्नागिरी

I) **प्रस्तावना -** 1840-1900 हा कालखंड सामाजिक सुधारणांच्या दृष्टीने धामधुमीचा कालखंड, प्रामुख्याने सामाजिक प्रबोधनाचा मानला जातो. या काळात स्त्रियांच्या संदर्भातील अनेक प्रश्न पुढे आले या संदर्भात समाजभूमिका, मनोभूमिका तयार करण्याचे कार्य अनेक सुधारकांनी केले. महाराष्ट्रात लोकहितवादी (गो.ह.देशमुख), ज्योतीराव फुले, सावित्रीबाई फुले, विष्णूशास्त्री पंडित, आगरकर, न्या. रानडे, भांडारकर अशा अनेक थोर समाजसुधारकांनी स्त्रियांसाठी स्वातंत्र्याच्या वाटा खुल्या केल्या. ब्रिटीश राजवटीत स्त्रियांना आपल्या दास्याची जाणीव होवू लागली. या राजवटीत स्त्रियांना काही माणुसकीचे व काही नागरिकत्वाचे अधिकार मिळाले. प्राथमिक, माध्यमिक मग महाविद्यालयीन द्वारे उघडली गेली. स्त्री शिक्षण, विधवा विवाह, केशवपन निषेध, बालविवाह इ. पुरस्कार करीत या समाजसुधारकांनी पथदर्शक काम केले. न्या. रानडे, गोपाळकृष्ण गोखले, महात्मा फुले, आगरकर इ.स्त्रियांना त्यांच्यावरील अन्यायाची जाणीव करुन देणारे पहिले नेते, समाजसुधारक पुरुषच होते. समाजाचा अर्धा भाग असलेली स्त्री जर मागे राहिली तर समाजाची उन्नती होणे अशक्य नाही हे या द्रष्टया पुरुषांनी जाणले होते. सावित्रीबाई, पंडिता रमाबाई, रमाबाई रानडे, असे अपवाद वगळले तर स्त्रियांच्या कल्याणासाठी पुरुषांनीच पुढाकार घेतला. प्रज्ञावंत डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे समाजद्रष्टे होते. स्त्री आत्मनिर्भर झाली पाहिजे. कारण ती समाजाचा मुलाधर आहे. हे त्यांचे विचारसूत्र होते. स्त्री सबलीकरणाचे ते कट्टर पुरस्कर्ते होते. त्यामुळे सदर शोधनिबंधात ‘‘ महिला सबलीकरणातील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान’’ या विषयावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे.

II) **उद्दिष्टे -** 1. महिला सबलीकरण संकल्पना, उद्दिष्टे समजून घेणे,
2. डॉ. आंबेडकरांचे महिलाविषयक विचार समजून घेणे.
3. महिला सबलीकरण का आणि कसे याविषयीचे विचार लक्षात घेणे
4. महिला सबलीकरणामुळे खरोखरच समाजविकास झाला आहे का याची शहानिशा करणे.

**III) अभ्यासाची गृहितके -**

1. महिला सबलीकरणसंदर्भात प्राचीन समाजात डॉ. आंबेडकरांसारख्या विचारवंतानी प्रकाश टाकला आहे.
2. महिला सबलीकरणातच समाजविकास दडलेला आहे अशी धारणा होती
3. महिलांचे सबलीकरण म्हणजे कुटुंब आणि समाज यांचे सबलीकरण यावर विश्वास होता.

IV) **संशोधन पध्दती** - सदर संशोधन प्रबंधासाठी दुय्यम माहितीचा आधार घेतला आहे. अभ्यासाची उद्दिष्टये लक्षात घेवूनच विविध प्रकाशित पुस्तके, वर्तमानपत्रे, नियतकालिके,इत्यादी मार्गांनी माहिती मिळविली आहे.

## V) महिला सबलीकरण संकल्पना -

स्त्रियांच्या विकासासंबंधी जाणीव असणे हे स्त्रीच्या सबलीकरणाचे मूलतत्व मानले जाते. स्त्री अधिकाराचा पुरस्कार करणारी ही संकल्पना आहे. स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने विकास व प्रगतीच्या समान संधी उपलब्ध करुन देणे, हे खरे स्त्रियांचे सबलीकरण होवू शकते. महिलांना पुरुषांच्या बरोबरीने सामाजिक, आर्थिक व राजकीय हक्क मिळवून देणे म्हणजे सबलीकरण.

समाजामध्ये स्त्रियांना उपेक्षित ठेवण्याचा विकास प्रक्रियेपासून लांब ठेवू पहाणाऱ्या शक्तींमध्ये मतपरिवर्तन घडवून आणण्याची प्रक्रिया ही महिला सबलीकरण मानले जाते. महिला सबलीकरण म्हणजे त्यांना राष्ट्र विकासाच्या प्रक्रियेत पुरुषांच्या बरोबरीने सहभागी करुन घेणे होय. शारिरीक व मानसिक हिंसाचारापासून महिलांची सुटका करणे होय.

महिलांच्या निरक्षरतेचे प्रमाण कमी करणे, आर्थिक स्वावलंबन, राजकीय प्रक्रियेत सहभाग, प्रसारमाध्यमे, आरक्षण, विविध कायदे इ. मार्गांचा वापर करुन महिला सबलीकरण होवू शकते. आज स्त्री शक्ती अधिकाराचा पुरस्कार करणारी सर्व समावेषक विचारसरणी निर्माण झाली आहे. महिला सबलीकरण त्याच विचारसरणीचा एक भाग मानले जाते. या स्त्रीवादी विचारसरणीची दोन प्रमुख तत्वे आहेत.

अ) लिंगभेदाच्या आधारावर पुरुषांच्या बरोबरीने समानसंधी मिळणे.

ब) विषम वागणूक नष्ट होवू शकते यावर ही विचारसरणी विश्वास ठेवते.

➢ **महिला सबलीकरण नवविचारसरणी -**

- लिंगभेदाला विरोध करणे.
- स्त्रियांना पुरुषांबरोबर समान संधी व अधिकार उपलब्ध करुन देणे
- स्त्रियांचे होणारे शारिरीक व मानसिक व आर्थिक शोषण नष्ट करणे.
- स्त्रियांना राष्ट्र विकास प्रवाहात सहभागी करुन घेणे.

## VI) महिला सबलीकरणाची उद्दिष्टे -

### 1) स्त्री पुरुष समानता -

महिला सबलीकरणाची मुख्य मागणी स्त्री पुरुष समानता प्रस्थापित करणे ही आहे. लिंगभेदावर आधारलेली पुरुषप्रधान संस्कृती आता नष्ट केली पाहिजे. राष्ट्र विकासाच्या प्रवाहात स्त्रियांना समानसंधी, समान दर्जा, सत्तेत महत्वाचा वाटा उपलब्ध करुन देणारी व्यवस्था निर्माण व्हावी.

### 2) आर्थिक व सामाजिक न्याय -

ऐतिहासिक काळापासून पिढयानपिढया स्त्रियांवर अन्याय होत आलेले आहेत. त्यांना आर्थिक, सामाजिक व राजकीय अधिकार देण्यात आलेले नाहीत. त्याचा परिणाम स्त्रियांच्या विकासावर मर्यादा आलेल्या दिसतात. स्त्रियांना हे अधीकार प्रदान करुन देणे म्हणजे सबलीकरण.

**3) स्वावलंबन -**

स्त्रियांना स्वावलंबी बनविणे हे सबलीकरणाचे महत्वाचे उद्दिष्ट आहे. स्त्रियांना स्वयंरोजगार मिळाल्यास त्या स्वत:च्या पायांवर उभ्या राहू शकतील. त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या पाहिजेत. अर्थातच त्यामुळे देशाच्या आर्थिक विकासाला हातभार लागेल. व स्वत: महिलांचा विकास होईल. त्यामुळे स्त्रियांवर होणारे अन्याय दूर होण्यास मदत होईल.

**4) राजकीय निर्णय प्रक्रियेत सहभाग -**

राजकीय क्षेत्रात निर्णय प्रक्रियेमध्ये पुरुषांची मक्तेदारी पहावयास मिळते. यासाठी राजकीय निर्णय प्रक्रियेत महिलांचा सक्रीय सहभाग असणे आवश्यक आहे.

**5) साक्षरतेचे प्रमाण वाढविणे-**

तुलनात्मक दृष्टया स्त्री साक्षरतेचे प्रमाण कमीच आढळते. शिक्षणामुळे स्त्रियांच्या मानसिक, बौध्दिक विकास होवू शकेल. त्यामुळे होणारे अन्याय दूर होण्यास मदत होईल म्हणून स्त्रियांमधील निरक्षर प्रवृत्ती कमी व्हावी हे सबलीकरणाचे उद्दिष्ट आहे.

**6) समाजाच्या मानसिकतेचे परिवर्तन -**

स्त्रियांना उपेक्षित ठेवणाऱ्या ज्या प्रवृत्ती आहेत त्याविरुध्द समाजामध्ये मतपरिवर्तन करणे आवश्यक आहे. त्यासाठी स्वतंत्र आंदोलने, चळवळी, उभाराव्या लागतील. परंपरागत मागासलेल्या मानसिकतेला छेद देण्यासाठी नवविचारांची प्रेरणा निर्माण करावी लागेल.

**7) समानसंधी -**

स्त्रियांना सर्वच क्षेत्रांमध्ये पुरुषांच्या बरोबरीने समानसंधी उपलब्ध करुन देणे अर्थात संविधानाने ही संधी उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु त्याचा फायदा अधिकाधिक महिलांनी घ्यावा यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. महिलांना शासकीय विविध योजना व कार्यक्रम यांची माहिती करुन देवून त्यांच्याकडून सर्व प्रक्रिया पूर्ण होणे हे स्वयंसेवी संघाचे महत्वाचे कार्य ठरते.

थोडक्यात राष्ट्रीय विकास ही केवळ पुरुषांची जबाबदारी आहे असे नाही तर समाजाचा एक घटक म्हणून तेवढीच जबाबदारी स्त्रियांची देखील आहे याची जाणीव निर्माण करणे हे महिला सबलीकरणाचे उद्दिष्ट आहे.

**VII) महिला सक्षमीकरणासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकराचे कार्य**

“ कशीही असो स्त्री कुटुंबकेंद्रीच असते
म्हणूनच तिने सजग होणे गरजेचे असते.”

भारतातील स्त्री विकासाच्या प्रगतीच्या कार्यात डॉ. आंबेडकरांचे योगदान फार महत्वाचे आहे. वंचित, शोषित, पीडीत, महिला वर्गाच्या सबलीकरणासाठी सक्षमीकरणासाठी त्यांनी केलेले कार्य फार मोलाचे आहे. डॉ. आंबेडकरांनी भारताच्या राज्यघटनेत स्त्रीपुरुष समतेची जाहीर नोंद करुन ऐतिहासिक कामगिरी केली आहे.

महिला सबलीकरणाच्या उद्दिष्टांचा विचार करता आंबेडकरांनी केलेले प्रत्येक कार्य हे आजच्या नवविचारसरणीचा आधार आहे असे म्हटले तर वावगे ठरू नये.

### ➢ स्वाभिमान जागृतीसाठी सभा -

स्त्री पुरुष यांनी मिळूनच समाजाच्या संसाराच्या अडचणी सोडविल्या पाहिजेत हे त्यांचे मत होते याशिवाय त्यांचे रहाणीमान मुलामुलींचे शिस्त याबाबत ते प्रबोधन करीत . 1927 मध्ये घडलेल्या सत्याग्रहाच्यावेळी कोणत्याही पदावर नसतानादेखील जवळपास 5000 स्त्रियांची त्यांनी स्वतंत्र सभा घेतली होती.

### ➢ दलित स्त्रियांची परिषद -

स्त्रियांची प्रगती ज्या प्रमाणात झाली असेल त्यावरुन एखादया समाजाची प्रगती मोजता येते. या दृष्टीने प्रबोधन करताना 1942 मध्ये नागपूर येथे 20 ते 25 हजार स्त्रियांची परिषद घेण्यात आली होती त्यावेळी त्यांनी आपल्या भाषणात विशेषत: विवाहित मुलींना संबोधित करताना सांगितले की लग्न झालेल्या प्रत्येक मुलीने पतीची एक मैत्रिण म्हणून त्याच्या समवेत सहकार्य करावे. समतेचा आग्रह धरावा.

### ➢ कायदा मंत्री म्हणून केलेले कार्य -

समाजाला योग्य प्रकारे बदल घडवून आणण्यासाठी कायदा हा महत्वाचा घटक आहे हे त्यांनी जाणले होते. स्थानिक स्वराज्य संस्था, मालकी हक्क, सक्तीचे व मोफत शिक्षण, सकस आहार, शरीरस्वास्थ्य व जीवनमान उंचावते अशा अनेक प्रकारे त्यांनी स्त्रियांना समानता मिळवून दिली. सर्व हिंदू कोड कायदयांचे संहितीकरण करुन सर्व हिंदूना एकच कायदा करुन स्त्रियांना समान हक्क मिळाला पाहिजे. यासाठी सरकारने 1941 साली “ हिंदू कोड कमिटी” नेमली होती. डॉ. आंबेडकर कायदामंत्री असल्याने हिंदे कोड बिल कायदयाच्या भाषेत मांडण्याचे काम त्यांच्याकडेच होते. प्रकृती चांगली नसतानाही त्यांनी काळजीपूर्वक व प्रामाणिकपणे काम केले.

### ➢ हिंदू कोड बिल -

ब्रिटीशांच्या काळापासून समाजसुधारणेबाबत काही कायदे पास झाले. परंतू भारतामध्ये असलेली असमानता नष्ट करण्याएवढी ताकद त्यांच्यामध्ये नव्हती. परंपरागत पारतंत्र्याच्या परिस्थितीतून बाहेर काढण्यासाठी सन्मानाचे स्थान व प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी हिंदू संहिता विधेयक म्हणजे “ हिंदू कोड बिल” तयार केले. यामध्ये त्यांनी सात कायदे एकत्रित समाविष्ट केले.

1) एखादा हिंदू मृत्यूपत्र न करता मरण पावला तर त्याच्या मिळकतीसंबंध हक्कदार स्त्री पुरुष
2) मृताचा वारसदार ठरविण्याचा अधिकार
3) पोटगी
4) विवाह
5) घटस्फोट
6) दत्तकविधान
7) अज्ञान पालकत्व

दोन वर्ष रात्रंदिवस मेहनत करुन तयार केलेल्या या बिलाला जीर्णमतवादी आणि सनातनी हिंदूनी कडाडून विरोध केला. या बिलाबाबत डॉ. आंबेडकरांना अतिशय मनस्ताप सहन करावा लागला. हे बिल हिंदू स्त्रियांना फायदा मिळवून देणारे होते. भारतातील सर्व धर्म, जाती आणि समाज यांचे कायदे स्त्रियांना न्याय देणारे नाहीत. ते तसे व्हावेत म्हणून डॉक्टरांनी प्रयत्न केले. परंतू हिंदू

ISSN: 2348-1390
Impact Factor: 4.321 (IIJIF)

कोड बिलाला मान्यता मिळाली नाही. शेवटी डॉ. आंबेडकरांनी आपल्या मंत्रिपदाचा राजीनामा दिला.

## ➢ भारतीय संविधान -

स्वातंत्र्य, समता, बंधुता या त्रिसुत्रींवर भारताची राज्यघटना आधारलेली आहे. भारताच्या राज्यघटनेने स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने समान हक्क दिले. डॉ. आंबेडकरांना राज्यघटनेचे शिल्पकार मानले जाते.या राज्यघटनेतील काही कलमांचा विचार करु.

1) संविधान कलम 14- या कलमात डॉ. आंबेडकरांनी कोणत्याही भारतीय व्यक्तीस भारताच्या राज्यक्षेत्रात कायदयापुढे समानता किंवा कायदयाचे समान संरक्षण नाकारता येणार नाही असे नमूद केले आहे.

2) कलम 15.1 - राज्य, धर्म, जात, वंश, लिंग, जन्मस्थान या अथवा यापैकी कोणत्याही कारणावरुन भेदभाव करता येणार नाही.

3) कलम 15.2 - सार्वजनिक ठिकाणी अस्पृष्यता न पाळणे

4) कलम 15.3 - स्त्रिया व बालके यांच्याकरिता विशेष तरतुदी

5) कलम 39 - उपजीविकेचे साधन मिळविण्याचा हक्क, समान वेतन

6) कलम 42- स्त्रियांनी प्रसुती सहाय्यासाठी तरतूद. पुनर्निर्मितीची क्षमता, व प्रकृती लक्षात घेवून स्त्रियांचे आरोग्य व कुटुंबाचे योग्य नियोजन याविषयी त्यांची भूमिका महत्वाची होती.

## ➢ विविध कायदयांचा आधार -

हिंदू कोड बिलात डॉ. आंबेडकरांनी कायदयांचा पाठपुरावा केला होता. समानतेच्या दृष्टीने हिंदू कोडमध्ये सुधारणा केल्याशिवाय राज्यघटनेला अर्थ रहाणार नाही असे त्यांचे मत होते. म्हणूनच निदान बहुसंख्य असणाऱ्या हिंदूचा कायदा बदलावा म्हणून प्रयत्न केले. त्यामुळे हिंदू कायदयात सुधारणा करण्यात आल्या. स्त्रियांच्या हितरक्षणासाठी भारतामध्ये जे वीस कायदे आहेत ते हिंदू कोड बिलाचे निरनिराळे भाग व त्यामध्ये काही बदल करुन मंजूर करण्यात आले आहेत.

- स्त्री प्रतिबंधक कायदा 1926
- हिंदू विधवा पुनर्विवाहोत्तेजक कायदा 1856
- भारतीय तलाक कायदा 1972
- ख्रिस्ती विवाह कायदा 1872
- विवाहित नारी संपत्ती संरक्षक कायदा 1974
- लीगल प्रॅक्टशनर (वुमेन्स) ॲक्ट 1923
- बालिका विवाह प्रतिबंधक (शारदा) 1926
- पारसी विवाह आणि तलाक कायदा 1936
- हिंदू नारी संपत्ती अधिकार कायदा 1936
- प्रसुती अवस्थेत मिळावयाचे हक्क संघश्री 1943
- हिंदू विजोड विवाह प्रतिबंधक कायदा 1946

- हिंदू विवाह वैधता कायदा 1946
- विशेष विवाह कायदा 1955
- हिंदू विवाह कायदा 1955
- हिंदू उत्तराधिकार कायदा 1956
- हिंदू दत्तकग्रहण आणि निर्वाह कायदा 1956
- हिंदू दत्तकग्रहण कायदा 1958
- वेश्यावस्ती निर्मूलन कायदा 1958

➢ **स्त्री परिवर्तनासंबंधी '' बोल महामानवाचे ''**

- ''घर प्रपंच्याच्या अडचणी ज्याप्रमाणे स्त्री व पुरुष मिळून सोडवितात त्याप्रमाणे समाजाच्या संसारातील अडचणी स्त्री पुरुषांनी मिळून सोडवावयास पाहिजेत. पुरुषांनी हे काम अंगावर घेतले तर ते पार पाडण्यास त्यांना पुष्कळ अवधी लागेल. याबद्दल शंका नाही. तेच काम स्त्रियांनी जर अंगावर घेतले तर त्या कामात लवकर यशप्राप्ती करुन घेतील .'' -- महाड 1927
- '' तुम्हाला समजले पाहिजे की स्त्री जात समाजाचा अलंकार आहे. प्रत्येक समाज स्त्रियांच्या चारित्र्याचा अधिक मान देतो. आपली गृहिणी होणारी स्त्री उत्तम कुलातील असावी अशी प्रत्येकजण अपेक्षा करतो ''
  -- धुळे 31 जुलै 1937
- '' अनेक स्त्रिया नको असलेली संतती टाळण्यासाठी अघोरी पध्दतीने गर्भपात घडविण्याचा प्रयत्न करतात. कारण काहीही असो. स्वीकारावीशी न वाटणारी बाळे जन्माला आली तर अशा अपत्यांच्या संगोपनाकडे मातांचे दुर्लक्ष होते. आशी संतती समाजावर निव्वळ भार बनते, रोगट व्यक्तींनी जन्माला घातलेल्या मुलांमुळे रोगट प्रजा निर्माण होते. या सर्व समस्यांवर एकमेव अधिकृत इलाज म्हणजे संततीनियमन ''
  -- मुंबई 1938
- '' मुलीला संपत्तीमध्ये हिस्सा देणे म्हणजे कुटुंबाच्या हिताला बाधा आहे या तर्काबाबत मी खूप मोकळेपणाने हे निवेदन करु इच्छितो की ज्या तर्कांची ताकद मी मान्य करु शकत नाही जर एका पुरुषाला बारा मुले आणि एक मुलगी असेल आणि जर वडिलांच्या मृत्युदिवशी बारामुलांनी संपत्तीचे वाटप करावयाचे ठरविले व त्याच वेळी मुलीला जर तेरावा वाटा मिळणार असेल तर कुटुंबाची कोणत्याप्रकारे हानी होणार आहे ?'' -- केंद्रीय विधीमंडळ, नवी दिल्ली फेब्रुवारी 1949
- '' आजच्या जगात संपत्तीच स्वातंत्र्याचा आधारस्तंभ आहे. जोवर स्त्रियांना संपत्तीचा वारसा मिळत नाही तोवर त्यांची गुलामगिरी संपणार नाही. त्यादृष्टीने हिंदू कोड बिलात मी तरतूद केली होती पण ते बील मंजूर होवू शकले नाही यामुळे आता येणारे बिल कोणत्या स्वरुपात येते व त्यात स्त्रियांच्या स्वातंत्र्याच्या हक्कांची काय तरतूद आहे याकडे महिलावर्गाने फार बारकाईने पाहिले पाहिजे इतकेच नाही तर आपल्या हक्कांसाठी झगडण्यास त्यांनी आपले मनोदौर्बल्य टाकून कंबर कसली पाहिजे तरच त्यांची सुधारणा व प्रगती होईल '' --
  कोल्हापूर 25 डिसेंबर 1952

ISSN: 2348-1390
Impact Factor: 4.321 (IIJIF)

- “ महिलांच्या सामाजिक उत्कर्षामध्ये कायदयाचे जे अडथळे यततात ते दूर करण्याचा प्रयत्न हिंदू कोड बिलात करण्यात आला आहे. स्वातंत्र्य हे धनसंपत्तीवर अवलंबून असते. आणि ते प्रत्येक महिलेने आपले स्वातंत्र्य आबाधित राखण्यासाठी आपली धनसंपत्ती आणि अधिकार यांची काळजीपूर्वक जपणूक केली पाहिजे ”
  -- बेळगाव 26 डिसेंबर 1957

**VIII) निष्कर्ष -**

महिला सबलीकरण संकल्पना, तिची विचारसरणी, उद्दिष्टे यांचा काळजीपूर्वक अभ्यास केला तर आपणास हे निश्चितपणाने जाणवेल की डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी महिलांच्या विविध समस्यांचा आपल्या ज्ञानाने, चिंतनाने, वस्तूनिष्ठपणे जाणीव ठेवून अभ्यास केला. कृतीशील प्रयत्न केले एवढेच नाही तर समस्यांच्या निवारणासाठी आपल्या मंत्रीपदाचा त्याग केला. दुर्दैवाने त्यांच्या निधनानंतर त्यांच्या कार्याला केवळ दलितांचे कैवारी या पुरताच गौरव केला जातो. परंतू अर्थशास्त्र, राज्यशास्त्र, इतिहास, मानववंशशास्त्र, मानसशास्त्र, ज्योतीषशास्त्र प्रशासनशास्त्र इ. विषयात केलेल्या कार्याचा विचार होणे आवश्यक आहे. स्त्रियांच्या परिवर्तनासाठी कायदयाची गरज जाणून त्यांनी केलेल्या प्रयत्नांना आता कोठे क्रियाशीलता लाभते आहे म्हणूनच म्हणावेसे वाटते की,

“ आभाळाने नाकारलेल्या पंखाना
उड्डाणाचे सामर्थ्य देणाऱ्या महामानवा
तुझे विचार आमचे आचार होवोत ”

**➢ संदर्भ -**

- स्त्री सूक्त , माधवी कुंटे , डायमंड पब्लिकेशन पुणे, 24 फेब्रुवारी 2009
- भारतातील महिला विकासाची वाटचाल, ज.शं. आपटे, पुष्पा शेंडे, डायमंड पब्लिकेशन, पुणे, फेब्रुवारी 2012
- बोल महामानवाचे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची 500 मर्मभेदी भाषणे - खंड 3, आत्मनिवेदन आणि मार्गदर्शन, अनुवाद आणि संपादन डॉ. नरेंद्र जाधव, ग्रंथाली प्रकाशन 2012
- सत्य आग्रही आंबेडकर (डॉ. आंबेडकरांनी केलेल सत्याग्रह व आंदोलन) संपादक सुहास सोनवणे, प्रकाशक अनुभव, अक्षरधन, मुंबई 27 जानेवारी 2013

❑❑❑